MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात



बीड : शिवसेनेचे नेते, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे हे बीडमध्ये आले होते. यावेळी महायुतीचा घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी नगरसेवक शुभम धूत, राष्ट्रवादी लिगल सेलचे जिल्हाध्यक्ष ड.नागेश तांबारे, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, राष्ट्रवादी विद्यार्थी शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे आदी उपस्थित होते.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०२ अंक –२२ बुधवार दि.०९ ऑक्टोबर २०२४ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-02 Issue -22 WEDNESDAY DT.09 OCTOBER 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# बीड जिल्ह्यातील सहा मतदारसंघांमध्ये भाजपचा गड ढासळणार











## आ. लक्ष्मण पवार भीमराव धोंडे रमेश आडसकर मोहन जगताप यांचे मोठे मताधिक्य पक्षासाठी महत्त्वाचे

## आ. प्रकाश सोळंकेंविरोधात पवारांकडून रमेश आडसकर, मोहन जगताप या दोघांपैकी एक उमेदवार येवू शकतो

**शरद पवारांच्या भुमिकेकडे बीड जिल्ह्यातील संपूर्ण मतदार संघाचे लक्ष लागून आहे. बीड जिल्ह्यामध्ये भाजपचा सुपडा साप आमलक्ष्मण पवार भिमराव धोंडे रमेश आडसकर मोहन तुतारीच्या वाटेवर पंकजाताई आता बीड जिल्ह्यामधलं राजकारण पाहता देशाच्या राजकारणामध्ये सक्रिय असल्यामुळे बीड जिल्हा भाजपवर परिणाम पंकजाताई मुंडे यांचे अनेक समर्थक पक्षांतराच्या भूमिकेत बीड जिल्हा हा धनंजय मुंडे चा बालेकिल्ला म्हणून यानंतर ओळख राहण्याची शक्यता चर्चाला? लक्ष्मण पवार पंकजा मुंडे यांचे वैर आता समोर येऊ लागले? लक्ष्मण पवारानी लोकसभेला पंकजाताईचे विरोधात काम केल्याची ही चर्चा?**

बीड /प्रतिनिधी

आ. लक्ष्मण पवार तुतारीच वाजवणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. येत्या दहा ऑक्टोबर रोजी त्यांचा शरद पवार गटात प्रवेश होणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यांचा शरद पवार गटात प्रवेश झाला तर महायुतीकडून विजयसिंह पंडितांच्या उमेदवारीचा मार्ग मोकळा होणार आहे. तसेच तुतारीकडून आष्टी भिमराव धोंडे यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. त्याचप्रमाणे माजलगावमध्ये तुतारीकडून रमेश आडसकर की मोहन जगताप उमेदवार आखाड्यात येणार याकडेही संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दहा तारखेला शरद पवार गटात होणार प्रवेश आष्टीतून धोंडे तर माजलगावमधून आडसकर की जगताप, शरद पवारांच्या भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष लागले. विधानसभेची निवडणूक तोंडावर आहे. या निवडणूकीची अचारसंहिता केव्हाही लागू शकते, त्याअनुषंगानेच सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ होताना पहायला मिळत आहे. विशेष म्हणजे मागच्या काही दिवसांपासून शरद पवारांच्या संपर्कात भाजपचे आ. लक्ष्मण पवार हेही आहेत. मागच्या दोन दिवसांपुर्वीच त्यांनी आघाडीच्या बैठकीलाही हजेरी लावली होती. त्याअनुषंगानेच आता त्यांचा येत्या दहा ऑक्टोबर रोजी शरद पवार गटात प्रवेश होणार असल्याचे सांगितले जात आहे. जर त्यांचा प्रवेश शरद पवार गटात झाला तर गेवराईत महायुतीकडून विजयसिंह पंडितांचा मार्ग मोकळा होणार आहे. वास्तविकतः शरद पवार बीड जिल्ह्यात मोठी उलथापालथ करत असल्याचेही समोर येत आहे. याच राजकिय उलथापालथीमध्ये आष्टीतून तुतारीकडून माजी आ. भिमराव धोंडेंना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर माजलगाव मतदार संघावरही शरद पवारांचे बारीक लक्ष आहे. याठिकाणी सोळंकेंविरोधात पवारांकडून रमेश आडसकर, मोहन जगताप या दोघांपैकी एक उमेदवार येवू शकतो. त्यामुळेच शरद पवारांच्या प्रत्येक भुमिकेकडे बीड जिल्ह्यातील संपूर्ण मतदार संघाचे लक्ष लागून आहे.

# धानोरा रोड परिसरातील नागरिकांचा विधानसभा निवडणुक मतदानावर बहिष्कार



**प्रतिनिधी । बीड**

शहराशी अनेक गावांना जोडणारा बीड शहरातील एक प्रमुख रस्त्यात गणना असलेला धानोरा रोड नगर रोड ते पालवन चौक या दीड ते दोन किलोमीटर अंतरात रस्त्याची अक्षरशः चाळणी झाली आहे शिवाय अनेक छोटे मोठे अपघातही यामुळे होत आहेत त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धानोरा रोडच्या कामासंदर्भात लोकशाही मार्गाने आंदोलन, उपोषण करण्यात आले यावेळी हजारो लोक, लहान मुलं रस्त्यावर उतरले परंतु बीड नगरपालिका प्रशासन व जिल्हा प्रशासन यांना रस्त्याच्या समस्येबाबत गांभीर्य नसल्याची बाब या निमित्ताने समोर येत आहे. उपोषण वेळी बीड नगरपरिषद कार्यालय यांच्या पत्रानुसार अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुक २०२४ मतदानावर धानोरा रोड परिसरातील सुज्ञ नागरिकांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला असल्या बाबत चे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

# विकासाचा आश्वमेध सुरच ठेवायाचा असेल तर गेवराईत लक्ष्मण पवारा शिवाय पर्याय नाही

## कहो दिलसे आण्णा फिरसे जनतेत होऊ लागली चर्चा

**प्रतिनिधी । गेवराई**

विधानसभा मतदारसंघात गावोगावी विकास जाव म्हणून आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात प्रमाणिक प्रयत्न केले आहे यांची साक्षीदार मतदारसंघातील मतदार आहे आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी आमदार झाल्यानंतर लगेचच

गेवराई मतदारसंघातील राशन वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडे करुन तत्कालीन अन्न पुरवठा नागरी मंत्री स्वर्गीय गिरीश बापट साहेब यांच्याकडे पाठपुरावा करून राशनचा काळाबाजार बंद करण्यासाठी राशन व्यवस्था ऑनलाईन केली पाहिजे अशी मागणी आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी त्यांच्या त्यांच्याकडे करून ऑनलाईन पद्धत सुरू झाल्यानंतर राशींच्या काळा बाजारावर प्रतिबंध लागेल असे ते म्हणाले होते

आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या मागणीची दखल घेत महाराष्ट्र सरकारने राशन वितरण व्यवस्थेत बायोमेट्रिक प्रणाली लागू लागू करून सर्व रेशन कार्डधारकांना न्याय देण्याचा आमदार लक्ष्मण पवार साहेबांनी प्रयत्न केलेला आहे त्यामुळे आज थम दिल्याशिवाय राशन मिळत नाही त्यामुळे राशींच्या होणाऱ्या काळबाजारावर बऱ्यापैकी परिणाम झालेला आज महाराष्ट्रात दिसत आहे हे आमदार लक्ष्मण पवार साहेबांच्या आमदारकीच्या काळातील पहिले यश आहे

त्यानंतर गेवराई विधानसभा



मतदारसंघामध्ये सन २०१२, २०१३,२०१४, मध्ये गेवराई मतदार संघाचा दौरा करत असताना आलेले कटू अनुभवाचा अभ्यास करून गेवराईच्या राजकीय पुढाऱ्यांनी केलेले मतदारसंघाकडे दुर्लक्ष याची जाणीव ठेवून आमदार म्हणून निवडून आल्या नंतर त्यांनी पूर्ण मतदारसंघाचा बायोडाटा तयार करून टप्प्याटप्प्यानं निधी उपलब्ध करत मतदारसंघातील रस्ते जोडणी ला सुरुवात केली नऊ वर्षांमध्ये मतदारसंघातील प्रत्येक रस्त्याला हायवेची जोडत असताना जास्तीत जास्त शॉर्टकट रस्ता कसा तयार होईल यासाठी आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी प्रामाणिकपणे काम केले मंजूर मंजूर करून आणलेला निधी योग्यरीत्या मार्गे लागावा म्हणून प्रत्येक रस्त्यावर चालू असलेल्या कामाची जातीने पाहणी करत दर्जामध्ये कुठलीही तडजोड न करता गेवराई मतदार संघातील दर्जेदार रस्ते निर्माण करून महाराष्ट्रामध्ये स्वतःची रोडकरी अशी ओळख आमदार लक्ष्मण पवार यांनी निर्माण केलेली आहे

काही काही दिवसावर विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची तयारी आहे सर्व राजकीय पुढारी आपण निवडून कशी येऊ याची जोडणी करत आहे पण गेवराईचे आमदार लक्ष्मण आण्णा पवार निवडणुकीची नव्हे तर मतदारसंघातील रस्ते जोडणी करण्यासाठी काम करत असल्याने जनतेमध्ये आमदार लक्ष्मण आण्णा पवारांचे जनतेत कौतुक करून कहो दिल से अण्णा फिरसे याची चर्चा जनता करत आहे

# शरदचंद्र पवार राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे घंटानाद आंदोलन

**प्रतिनिधी । बीड**

भाजप प्रणित महाराष्ट्र सरकारने राज्यात अक्षरशः शिक्षणाचा खेळ खंडोबा केला आहे. सरकारने दोन वर्षांपासून शिक्षण क्षेत्राशी निगडित घेतलेले असंख्य निर्णय हे विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यापासून वंचित ठेवत आहेत. हे सरकार बदलल्या शिवाय विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडचणी संपणार नाहीत. असे आवाहन करत आज बीड जिल्हयातील/शहारातील शरदचंद्र पवार राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी बीड शहर येथे एकत्र येत घंटानाद आंदोलन केले.

यावेळी आंदोलनाची माहिती देताना राष्ट्रवादी विद्यार्थी मराठवाडा अध्यक्ष कुंदन काळे व विद्यार्थी जिल्हाध्यक्ष अमोल चव्हाण यांनी सांगितले की १. कमी पटसंख्येच्या नावाखाली राज्यातील १४ हजाराहून अधिक जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्याचा डाव भाजप सरकारने आखला आहे.

२. जिल्हा परिषदेच्या या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक नेमण्याचा निर्णय नुकताच भाजप सरकारने घेतला आहे.

३. जिल्हा परिषदेच्या शाळेतील संपूर्ण विद्यार्थ्यांना अजूनपर्यंत साधा गणवेश या सरकारला देता आला नाही.

४. राज्यातील शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालयात कायमस्वरूपी शिक्षक या सरकारला नेमता आलेले नाहीत.

५. जे शिक्षक नेमले आहेत ते कंत्राटी स्वरूपात नेमले आहेत आणि या शिक्षकांना देखील गेल्या दीड दोन वर्षांपासून पगार दिलेला नाही.

६. यावर्षी तर या तंत्रनिकेतन महाविद्यालयात अजून पर्यंत शिक्षकच नेमलेले नाहीत.

७. राज्यातील विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देणाऱ्या असंख्य कंपन्या गुजरात व इतर राज्यात गेल्या आहेत.

८. काही महिन्यांपूर्वी वैद्यकीय प्रवेश परीक्षेत भ्रष्टाचार झाल्याने राज्यातील मुले डॉक्टर होण्यापासून



वंचित राहिली आहेत.

९. मागील वर्षी पर्यंत च-झहरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणारा १८००० रुपयाचा स्टायपेंड सध्या बंद करण्यात आला आहे.

१०. राज्यातील फार्मसी विद्यालयांचे प्रवेश फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या दप्तर दिरंगाईमुळे उशिरा सुरू झाले, त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे.

११. पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संशोधन आधीछात्रवृत्ती या सरकारने बंद केली. निवडणुका जवळ आल्याने ती पुन्हा लागू करू अशी पोकळ घोषणा करण्यात आली आहे.

१२. राज्यातील शिक्षक, प्राध्यापक तसेच सरळसेवेने भरण्यात येणाऱ्या असंख्य जागा रिक्त आहेत.

१३. सरळ सेवा परीक्षांची फी मोठ्या प्रमाणात वाढवून विद्यार्थ्यांना अडचणी निर्माण केल्या आहेत.

१४. राज्यात अजूनही विविध विभागात कंत्राटी भरती चालू असून नुकत्याच वैद्यकीय शिक्षण विभागात कंत्राटी कामगार नेमण्यासाठी तीन एजन्सी नियुक्त करण्यात आल्या आहेत.

१५. राज्य सरकारने जाणीवपूर्वक शिक्षण हक्क कायद्यात बदल करून ही प्रवेश प्रक्रिया लांबवली त्यामुळे राज्यातील असंख्य विद्यार्थी पहिलीला खासगी शाळेत मोफत प्रवेश घेऊ शकले नाहीत. अशा प्रकारच्या विविध निर्णयामुळे राज्यात सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे अवघड होऊन बसले आहे. हे सरकार बदलले नाही तर राज्यातील विद्यार्थी देशोधडीला लागतील. म्हणून शिक्षण वाचवण्यासाठी हे सरकार बदलणे आवश्यक आहे. यावेळी आंदोलनाला राष्ट्रवादी युवक प्रदेश सचिव के के वडमारे,ऋषिकेश गडदे,शुभम जोगदंड,अमित डोंगरे जिल्हासचिव,अलंकार सरवदे जिल्हासरचिटणीस,अजय पवार,पवन पवार,चंद्रकांत ईकुभावे,कृष्णा गवारे ओमकार भिसे,सुधीर चव्हाण, सुनील सातपुते,व्यंकटेश कुडगर, अभि डिसले,अक्षय सोनवणे,प्रवीण सोनवणे,ऋतूराज मायकर,ऋषिकेश भोसले,विश्वनाथ भोसले,आदिनाथ भोसले,पितांबर सोळुंके,बालाजी थावरे,बप्पा मोरे,संदेश धुमाळ,गोविंद पांचाळ,आशोक चोले,सोमनाथ सखराते व इतर उपस्थित होते.

# बिंदुसरा धरणात घातकी पर्यटन करणारांवर अंकुश

## महसूल व पोलीस प्रशासन सतर्क : हुल्लडबाजांना हुसकावून लावले:- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी । बीड**

बीड शहरापासून जवळ आणि धुळे -सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत सध्याचे पर्यटन केंद्र असलेले बिंदुसरा धरणात सध्या घातकी पर्यटन सुरू असुन याबाबतीत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी पुराव्यानिशी तहसीलदार बीड, ग्रामीण पोलीस स्टेशन यांना लेखी तक्रारी द्वारे संभाव्य धोक्याची दाट शक्यता असल्याची तक्रार करत आवश्यक उपाययोजना करण्यात येऊन सुरक्षारक्षकाची मागणी करण्यात आली होती. याची दखल घेत महसूल आणि पोलिस प्रशासन सतर्क झाले असुन तलावाची भिंत, चादरीवर फिरणारे तसेच तलावात आणि सांडव्याच्या डोहात पोहणा-यांवर अंकुश लावत सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आहे.

बिंदुसरा मध्यम प्रकल्प दिड महिन्यापुर्वीच जोरदार पावसाने तुडुंब भरले असुन चादरीवरून पाणी ओसंडून वाहत आहे. बीड शहरापासुन १० किलोमीटर अंतर असल्याने बीडकरांसाठी हे पर्यटन केंद्र झाले आहे. धुळे -सोलापुर राष्ट्रीय महामार्गावरील लांब पल्ल्याच्या जड वाहनांचे चालक देखील आंघोळीची सोय म्हणून धरणाच्या पाण्यात उतरत आहेत. हौशी व पर्यटक मोठी भिंत, सांडवा,चादरीवरून चालत फोटो सेशन करत आहेत.दरम्यान संपूर्ण तलाव गाळयुक्त आहे.त्यात सतत पाण्यानेही तलावाच्या कडेला गाळ साचला आहे.पर्यटक



सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
मुख्य संपादक दीपक थोरात - मो.9860898564

### बिंदुसरा धरणाचा स्विमिंग पूल झालाय; पर्यटकांचे धाडस जीवघेणे तर प्रशासन बेफिकीर :- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

पाली येथील बिंदुसरा मध्यम प्रकल्प पुर्ण क्षमतेने भरले असुन ओसंडून वाहत आहे. त्यामुळे बीड शहरातील तसेच धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीमुळे तलावाच्या सांडव्यावरून वाहणारे पाणी पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत आहे.मात्र याचवेळी काही हौशी पर्यटक सांडव्यातील भिंतीवरून जीव धोक्यात घालून चालताना दिसतात तर काही धरणाच्या भिंतीवर बसुन फोटोसेशन करतात.तर काही जण धरणाच्या पाण्यात उड्या मारत पोहतात. बिंदुसरा धरण पाणलोट क्षेत्र अंतर्गत प्रतिबंध क्षेत्रात अपघात, दुर्घटना अथवा अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे आवश्यक उपाययोजना करण्यात यावी अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार बीड, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड, पोलिस निरीक्षक ग्रामीण पोलीस स्टेशन बीड यांना केली आहे. सोमवार रोजी बिंदुसरा धरणाच्या सांडव्याच्या डोहातील पाण्यात बुडुन मृत्यूमुखी पडलेल्या ओंकार शिंदे आणि शिव पिंगळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करू सुरक्षित पर्यटन करावे यासाठी संदेश दिला जाणार आहे.

बिंदुसरा धरणाचा सांडव्याशेजारी धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कडेला सावधान प्रतिबंधात्मक क्षेत्र असा फलक लावण्यात आला असुन अपघात, दुर्घटना अथवा जिवितहानी झाल्यास जलसंपदा विभाग जबाबदार नाही असे कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड यांच्या आदेशानुसार असे लिहिलेले पाहावयास मिळते. बीड ग्रामीण पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधला असता जबाबदारी जायकवाडी प्रकल्प संबधितांची असल्याचे सांगितले जाते. एकंदरीतच दोन्ही विभागाकडून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न दिसून येत आहे.

दि.१९ ऑक्टोबर २०२१ रोजी बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडून ओंकार लक्ष्मण काळे वय १६ वर्षे आणि शिव संतोष पिंगळे वय १६ वर्षे रा.शिंदेनगर कॅनॉल रोड बीड यांचा दुर्दैवी अंत झाला होता. मात्र यापासून पर्यटक कोणताही बोध घेत नसुन त्यांचे लक्ष्य वेधण्यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली दि.०७ सोमवार रोजी बिंदुसरा धरणाच्या ठिकाणी मयत ओंकार शिंदे आणि शिव पिंगळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून सुरक्षित पर्यटन करावे असा संदेश दिला जाणार आहे.

05 Oct 2024 - Page 2 | epaper.maharashtraaarambh.com
Powered by softisky | 9764331134

यात पोहण्यासाठी उड्या मारतात.त्यामुळे गाळात फसुन बुडण्याचा धोका आहे. तसेच ३ वर्षांपूर्वी दि.१९ आक्टोबर २०२१ रोजी बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडून ओंकार लक्ष्मण काळे ( वय १६ ) व शिव संतोष पिंगळे ( वय १६) दोघेही रा.बीड या युवकांचा दुर्दैवी अंत झाला होता. त्यामुळे संभाव्य धोका टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करत सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली होती.याची दखल घेत बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या सुचनेवरून पाली सज्जाचे तलाठी अनिल गायकवाड, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलिस कर्मचारी शेख रज्जाक, दिलीप घोलप,तुकाराम नागरगोजे,प्रशांत वीर यांचे पथक बिंदुसरा धरणाभोवती गस्त घालत असुन घातकी पर्यटन करणा-यांना हुसकावून लावले जात आहे.

## शेतकऱ्यांचा आवाज दबणार नाही!

# तेलगावचे धरणे आंदोलन दिवसेंदिवस जोर धरत आहे !

**प्रतिनिधी । किल्ले धारूर**

किसान सभेचे दुसऱ्या टप्प्यातील बेमूदत धरणे आंदोलन मौजे तेलगाव तालुका धारूर येथे पाचव्या दिवशीही जोरदार सुरू आहे. शेतकऱ्यांच्या पिकांना घामाचे दाम म्हणजेच हमीभाव, संपूर्ण कर्जमाफी, प्रलंबित अनुदान आणि पारदर्शक विमा वाटप या मागण्यांसाठी शेतकरी धरणे धरत आहेत.लाल बावट्यांचा ठसा आणि जनजागृतीचा ज्वर:आंदोलन स्थळी लाल झेंडे फडकत आहेत, कला पथकांची क्रांती गीते वातावरणात उत्साह आणत आहेत. शेतकरी प्रश्नांवर जनजागृतीचा ज्वर फुटतोय. तेलगावचे ग्रामस्थ आंदोलकांना भेट देणाऱ्या शेतकऱ्यांचे हार्दिक स्वागत करत आहेत. अन्न, पाणी आणि राहण्याची सर्व सोय करतायेत.

शेती प्रश्नांवर पुस्तके, रात्रीच्या वेळी सांस्कृतिक कार्यक्रम:किसान सभेच्या वतीने आंदोलकांना वैचारिक खत पाणी म्हणून शेती प्रश्नांवरील पुस्तके वाटली जात आहेत, रात्रीच्या वेळी गावातील ग्रामस्थांसाठी किर्तन, प्रवचन, भजन आणि जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.शेतकरी आंदोलन दिवसेंदिवस जोर धरत आहे, आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी प्रशासनाचे काही कनिष्ठ अधिकारी आले, चौथ्या दिवशी धारूर तालुका कृषी अधिकारी आले, आज जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी व विमा कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आंदोलकांशी चर्चा करणार आहेत परंतु, प्रशासनाने आंदोलकांना दिलेल्या




### कले कलेने वाढत आहे आंदोलन:

शेतकरी आंदोलन कले कलेने वाढत आहे, हे आंदोलन शेतकऱ्यांच्या संकल्पबद्धतेचे प्रतीक आहे. आगामी काळात या आंदोलनाचा काय टप्पा येतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.या आंदोलनात कॉम्रेड दत्ता डाके, विठ्ठल लगड, कॉम्रेड भगवान बडे, रामदास सलगर, ह. भ. प. लक्ष्मण महाराज तिडके, कॉम्रेड सुभाष डाके, कॉम्रेड अजय बुरांडे, कॉम्रेड जगदीश फरताडे, कॉम्रेड विशाल देशमुख, कॉम्रेड विष्णुपंत देशमुख, कॉम्रेड मदन वाघमारे,, नवनाथ धुमाळ, कृष्णा लगड, महेश लगड, भाऊसाहेब लगड आदी. विशेष परिश्रम घेत आहेत

अश्वसनांची पूर्तता केली नाही तर आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. खासकरून २०२३ खरीप पिकविम्यापासून वंचित शेतकऱ्यांपैकी प्रशासन २,२८,००० शेतकऱ्यांच्या नामंजूर तक्रारींचा पुनर्विचार करणार होती तसा केला गेला असून १,२५,००० शेतकऱ्यांना पीकविमा कंपनीने पीकविमा वाटप केल्याचे समजते, यावर किसान सभेचे म्हणणे आहे की, सर्वच्या सर्व शेतकऱ्यांना विमा अदा करा व कोणाला किती, कसा विमा दिला याच्या याद्या देखील प्रकाशित करा; सोबतच २०२३ रब्बी विम्याचे पूर्ण वाटप करा ही देखील मागणी शेतकऱ्यांनी लाऊन धरली आहे.

# गेवराई तालुका परिवर्तन संघ संघटक पदावर निवड जाहीर संघटीत परिवर्तन करण्याचा निश्चय - ॲड. संजय काळे

**प्रतिनिधी । गेवराई**

गेवराई : विधानसभा मतदारसंघातील सामाजिक कार्यकर्ते, सुजाण नागरिकांनी सध्याच्या परिस्थितीत संपूर्ण परिवर्तन करण्याचे निश्चित केले असून त्या करिता गेवराई तालुका परिवर्तन संघाची संघटनात्मक बांधणी करताना बैठकीत समाजात काम करणाऱ्या समाजासेवकांची संघटक म्हणून सर्वप्रथम श्री श्यामराव गायकवाड पाटील, रामनाथ महाडीक, मा.सरपंच अशोकराव खरात,मनोज शेंबडे पाटील यांची नियुक्ती गेवराई तालुका परिवर्तन संघाचे अध्यक्ष ड संजय भाऊंना केली.विधानसभा मतदारसंघातील विकास, नियोजन,नागरिकांच्या अडचणी, सामाजिक कार्यकर्ते यांची यावर चर्चा, विनिमय करण्यासाठी प्रत्यक्ष बैठका , वाट्सअप द्वारे सुसंवाद करण्यासाठी जालना रोड वरील जुन्या बस स्टॅण्ड शेजारच्या परिवर्तन संघाच्या कार्यालयात २८ सप्टेंबर ते २ आक्टोंबर पर्यंत वैचारिक परिवर्तन सप्ताह चे आयोजन करून संजय भाऊ स्वतः सर्वांची चर्चा केली,आज समाजातील विविध सामाजिक स्तरावर काम करणाऱ्यांची गेवराई तालुका परिवर्तन संघाच्या संघटक पदी नियुक्ती करण्यात आली.यांचे अभिनंदन डॉ मिलिंद गावडे, मेजर राजेंद्र कापरे, साहेबराव राठोड, सोपानराव टेकाळे,रमेश पिंपळे, सुनील शिंदे यांनी केले.या वेळेस गेवराई मतदारसंघात

परिवर्तनातुन प्रगतीकडे

जनतेच्या अर्थिक, सामाजिक विकासासाठी भावनिक अथवा दबावाखाली न येता गेवराई तालुक्यातील जनतेने संघटीत परिवर्तन घडवण्याचे आवाहन ड.संजय भाऊ काळे यांनी केले. गेवराई तालुका परिवर्तन संघ ९०% समाजकारण व १०% राजकारण करणारी सामाजिक संघटना असुन गेवराई मतदार संघात संपूर्ण परिवर्तन करण्यासाठी समिती स्थापन करू असे भाऊंनी सांगितले. गेवराई मतदारसंघात या विधानसभेत संपूर्ण परिवर्तन करण्याचा निर्णय घेवून सर्वांनी पुढे येण्याचे आवाहन या पत्रकातून केलं आहे.

# बीडमध्ये डीपीसीच्या ६ कोटीतून २५० सोलर हायमास्ट बसविणार

**प्रतिनिधी । बीड**

शहरातील नागरिकांच्या मागणीनुसार विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी डीपीसीतून ६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यातून २५० सोलर हायमास्ट बसविण्यात येणार असल्याने शहर लखलखणार आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून निधी मिळाला असून पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे भरीव निधी दिल्याबद्दल आभार मानले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून बीड विधानसभा मतदारसंघातील शहर व ग्रामीण भागासाठी कोट्यवधींचा निधी मिळाला आहे. त्यातील अनेक विकासकामे प्रगतीपथावर आहेत. अलिकडे शहरातील अनेक भागात पथदिवे बंद असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. हे पथदिवे सुरू करून अंधार





दूर करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत होती. या मागणीची दखल घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर डीपीसीतून ६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून त्यातून २५० सोलर हायमास्ट बसविण्यात येणार आहेत. तसेच, शहरातील अनेक जुन्या पोलवरील एलईडी पथदिवे बंद आहे. त्याठिकाणी देखील एलईडी पथदिवे बसविले जाणार आहेत. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली असून दिवाळीच्या अगोदरच बीड शहर लखलखणार असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

### बीड मतदारसंघात कोट्यवधींची कामे सुरू

बीड विधानसभा मतदारसंघात कोट्यवधींची विकासकामे प्रत्यक्षात सुरू आहेत. अनेक कामे पूर्णत्वास गेली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. रस्ते, नाल्या, पथदिव्यांसह विजेची कामे, सभागृह, अंगणवाडी, दवाखान्यांसह विविध दुरुस्तीच्या कामांचा देखील यामध्ये समावेश आहे. या कोट्यवधींच्या विकासकामांसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिला आहे.



शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी शारदीय नवरात्र मोहत्सवानिमित्त आज बीड शहरातील ग्रामदैवत(तुळजापूर ठाणे) खासबाग देवीची सहाव्या माळीची आरती करून मनोभावे दर्शन घेतले व सर्वांना नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कृ.उ.बा.स माजी सभापती दिनकरराव कदम,चाकरवाडीचे पोलीस पाटील नानासाहेब काकडे,राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष झुंजार धांडे,मच्छिंद्र बन,दिपक घोडके पाटील, ऋषी भैय्या गिरी,हरि मावसकर सह सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते..!!




शिवसेनेचे खासदार युवा नेते श्रीकांत शिंदे बीड असताना शिवसेना युवा सेनेच्या वतीने सत्कार करताना माजी जिल्हाप्रमुख पपू बरिदे व शिवसैनिक

# केजवासीयांचे स्वप्न पूर्ण होत असल्याचा आपल्याला मनस्वी आनंद-आ.नमिता मुंदडा

## केज येथे सांस्कृतिक सभागृहाच्या पायाभरणी, क्रीडा संकुलाचे भूमिपूजन

प्रतिनिधी । केज

बाळासाहेब जाधव केज शहरात लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या नावाने सांस्कृतिक सभागृह व तालुका क्रीडा संकुल उभारणीतून केजवासीयांचे स्वप्न पूर्ण होत असल्याचा मनस्वी आनंद होत आहे. हे सभागृह ६०० आसन क्षमतेचे सर्व सोयी सुविधांचे होत असल्याने कलाप्रेमींना सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. तर क्रीडा संकुलात विविध खेळांच्या मैदानाचे नियोजन करण्यात आल्याने ग्रामीण खेळाडूंना घडण्यास मदत होणार आहे. असे प्रतिपादन आ.

गायरान जमिनीतील घरांना धक्का बसणार नाही पिसेगाव वैवील गावरान जमिनीत तालुका क्रीडा संकुलाचे काम होत असून वाठिकाणी वास्तव्यास असलेल्या लोकांनी आमची पर्वादी व्यवस्था करून परकुल बांधून द्यावीत अशी मागणी भूमिपूजन प्रसंगी केली. वावेळी पर्यायी जागा उपलब्ध करून परकुल बांधून देण्यात वेईल, तोपर्यंत बांधलेल्या घरांना पक्का लावला जाणार नाही. अशी ग्वाही आ. नमिता मुंदडा व तहसीलदार राकेश गिड्डे यांनी दिली. नमिता मुंदडा केज येथे लोकनेते पायाभरणी समारंभ व तालुका स्व. गोपीनाथ मुंडे साहेब सभागृह क्रीडा संकुल भूमिपूजन याठिकाणी वास्तव्यास असलेल्या लोकांनी आमची पर्यायी व्यवस्था करून घरकुल बांधून द्यावीत अशी मागणी भूमिपूजन प्रसंगी केली. यावेळी पर्यायी जागा उपलब्ध करून घरकुल बांधून देण्यात येईल. तोपर्यंत बांधलेल्या घरांना धक्का लावला जाणार नाही. अशी ग्वाही आ. नमिता मुंदडा व तहसीलदार राकेश गिड्डे यांनी दिली.

यावेळी बोलताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले कि स्व विमलताईंनी मतदार संघात काम करत असताना कधीही जात बघितली नाही त्यांच्या विचारांचा हाच वारसा आम्ही पुढी चालवत आहोत मतदार संघात विकासाचे एकही काम न आणणारे आमच्या काळात विकास झाला नाही असे म्हणतात अशी उपरोधिक टीका कोणाचेही नाव न घेता करत विकासाच्या मुद्यावर चर्चा करण्यासाठी खुल्या मंचावर समोरासमोर यावे असे आव्हान विरोधकांना त्यांनी दिले तसेच



राजकारणात पन्नास मार्क हे विकासाला, पंचेवीस मार्क चारित्र्याला तर उर्वरित पंचेवीस मार्क सुख दुःखात सामील होण्याला असतात तरच शंभर मार्काची बेरीज करून यश मिळवता येते असे सांगत काहींचे कान देखील त्यांनी टोचले तसेच मतदार संघातील प्रत्येक गावात विकासाची कामे झाली असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले तसेच केज शहरासाठी शंभर कोटींची नळयोजना देखील मंजुरीच्या अंतिम टप्यात असल्याची माहिती सांगत विकासासाठी आम्ही सदैव कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार देखील त्यांनी यावेळी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ वसुदेव नेहरकर यांनी केले तर प्रास्ताविक महादेव सूर्यवंशी यांनी केले तर कार्यक्रमास शहर व तालुक्यातील कलावंत व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

केज शहरातील लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे सांस्कृतिक सभागृहाची पायाभरणी व तालुका क्रीडा संकुलाचे भूमिपूजन आ. नमिता मुंदडा यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केज विधानसभेचे प्रभारी झारखंडचे आ. गवण रनखांब, जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, सुनील गलांडे, नेताजी शिंदे, दिलीप भिसे, शंकर उबाळे, वसंत केदार, डॉ. वसुदेव नेहरकर, महादेव सूर्यवंशी, भगवान केदार, महादु मस्के, मुरली ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नवरात्र उत्सवात योगेश्वरी मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई

## दर्शनासाठी मोठी गर्दी

प्रतिनिधी । अंबाजोगाई

आई राजा उदो उदो योगेश्वरी देवीचा उदो उदो या जयघोषात महाराष्ट्राचे शक्तीपीठ आणि भाविकांचे श्रध्दा स्थान असलेल्या योगेश्वरी मंदीरात घटस्थापना झाल्यानंतर ह्या शारदीय नवरात्र महोत्सवात मोठ्या भक्तीभावाने लाखो भाविक योगेश्वरीच्या दर्शनासाठी रात्रंदिवस गर्दी करीत आहेत.

रात्री मंदीर परिसर आकर्षक पद्धतीने केलेल्या विद्युत रोषणाईने उजळून निघाला असून विद्युत रोषणाईने सजलेले मंदिर भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे योगेश्वरी मातेच्या नवरात्र महोत्सवास मोठी परंपरा असून थाटामाटात देवल कमिटी संचालक, मानकरी,प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घटस्थापना करण्यात आली त्यानंतर त्या दिवशीपासून विविध सांस्कृतिक कार्यक्रम त्याचबरोबर भजन, कीर्तन,प्रवचन,पूजा विधी मोठ्या उत्साहात पार पडत आहेत. दिवसभर लाखो भाविक भक्तीभावाने देवी समोर नतमस्तक होऊन दर्शन घेत आहेत.

अनेक तरुण देवीच्या जयघोषात श्रीफळ बांधण्यासाठी गर्दी करत आहेत दिवसेंदिवस भाविकांच्या रांगा वाढतच असल्याचे चित्र दिसून येत आहेत. सकाळी अभिषेक, देवीची नित्योपचार पूजा संपन्न झाल्यानंतर सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लागतात सध्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभुमीवर मंदिर परिसरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात




असून जागोजागी पोलीस पहारा आणि नाकेबंदी करण्यात आलेली आहे दर्शनासाठी महिला, पुरुष यांची मोठी गर्दी होत आहे मात्र मंदीरास येण्या जाण्यासाठीच्या रस्त्यावर अतिक्रमण असल्याने या भागात पायी चालण्यासाठी किंवा वाहनांसाठी मोठी कसरत करावी लागत आहे याकडे संबधित प्रशासनाने लक्ष देण्याची भाविकांतून मागणी होत आहे.




**महाराष्ट्र राज्य रस्ता क्रमांक २२२ ते मेंढवाडादेवी व देवळाली या रस्त्यासाठी चार कोटी मंजूर करण्यात आले आहेत परंतु दसरा या दिवशी या देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी असते परंतु आज या रस्त्यावर काहीच नाही गुडघ्याएवढी खड्डे रस्त्यावर पडले आहेत मग या रस्त्याचे काम कधी चालू होणार असा प्रश्न आता जनतेकडून केला जात आहे छायाचित्र सुरेश कांबळे**

# मा. राज्यपाल महोदयांचा दौरा आहेच,तरी कशासाठी ??

## बीड शहर बचाव मंचाचा सवाल

प्रतिनिधी । बीड

आज होणाऱ्या माननीय राज्यपाल महोदयांच्या बीड दौऱ्या निमित्त मा. जिल्हाधिकारी साहेबांना आज सकाळी संपर्क साधून आम्ही विनंती केली की, आम्हाला बीड शहर बचाव मंचाच्या वतीने मा. राज्यपाल महोदय यांना निवेदन द्यायचे आहे. निवेदन हे बीड शहरातील नागरी समस्या व नगरपालिकेचा अकार्यक्षम कारभार याविषयी आहे. मा.जिल्हाधिकारी साहेबांनी याविषयी आम्हाला सांगितले की , त्यांना निवेदन देता येणार नाही हा दौरा तसा नाही..... मग हा दौरा नक्की कशासाठी आहे?? हा प्रश्न



आमच्या समोर पडला आहे.

मा. जिल्हाधिकारी महोदयांनी निवडक पक्षप्रमुखांना व पत्रकारांनाच पास दिले आहेत असे कळते. आमचा सवाल असा आहे की मग बीड दौरा कशासाठी..?? जर स्थानिक नागरिकांना आपल्या समस्यांच्या संदर्भात भेटता येणार नाही, जनतेच्या वतीने काही निवेदने स्वीकारले जाणार नाहीत तर नेमका दौरा कशासाठी...?? तरी मा. राज्यपाल महोदयांचा नेमका बीड जिल्ह्याचा दौरा कशासाठी हे अद्यापही समजले नाही व समजून घेण्याचा काही मार्ग कळला नाही. हे सगळं आमच्या बीडच्या नागरिकांना कळेल हे नक्कीच आहे.



# जात पात न पहाता अडचणीच्या काळात एका आवाजात मदतीला धावून येणारा जिग्री मित्र म्हणजे अविनाश इंगावले...!

**मित्राला संकटकाळी मदत करण्याची भावना सदैव मनात ठेवणारं आणि हृदयात सतत निर्मळ मैत्रीची ज्योत तेवत ठेवणार हजारो मित्र परिवारामध्ये सहृदय मित्र अशी ज्यांची ओळख आहे, ते व्यक्तिमत्त्व म्हणजे अविनाश इंगावले . आज अविनाश इंगावले यांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने या सहृदय मित्राबद्दलची भावना व्यक्त करावी, यासाठी हे सार लिहिण्याची धडपड.**

आजच्या स्वार्थी आणि मतलबी जगात सामान्य माणसासाठी आणि मित्रासाठी देखील कोणी फारसं काही करताना दिसत नाही. आज प्रत्येक जन आपल्या जातीच्या मानसा साठी पळत जातो पन अविनाश इंगावले फक्त मैत्री बघतो स्वतःच्या जातीचा समोरचा व्यक्ती असला तरी माझ्या साठी तो पळत येतोरात्री अपरात्री कधीही फोन करा एका रींग वर फोन उचलणार महाराष्ट्रात कोणत्याही शासकीय खात्यात काम असूदया एक फोनवर काम होणार मग् ते कितीही अवघड का असेना.पोलीस खात्या म्हध्ये त्यांचे एवढे संबंध कोणाचेच नाही सर्व पोलीस त्यांचे मित्र मित्र जर संकटात सापडला अशा परिस्थितीत अविनाश इंगावले हे व्यक्तिमत्व सामान्यांसह संकट असलेल्या मित्रासाठी मदत करायला सदैव तत्पर असतात. गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारितेत कार्यरत असताना अविनाश इंगावले यांनी ज्या ज्या ठिकाणी चुकीच्या गोष्टी घडत असतील त्या ठिकाणी पाठपुरावा करुन संबंधितांचा खरा चेहरा उघड करण्याचं काम केलं आहे. सामाजिक कार्याचा गवगवा किंवा गाजावाजा न करता

ज्या दवाख्याण्यात,पोलीस ठाण्यात, तहसील कार्यालयात किंवा ईतर ठिकाणी मित्राला किंवा त्यांच्या नातेवाईकांना चुकीच्या पद्धतीची वागणूक देण्यात येते, अशा प्रकारच्या तक्रारी आल्यास अविनाश इंगावले हे संबंधित अधिकाऱ्यांना न भांडता मैत्रीपूर्ण चर्चेद्वारे संबंधित मित्र आणि त्याच्या नातेवाईकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असतात. सर्वसामान्य माणूस आणि मित्रांमध्ये देव पाहणारे अविनाश इंगावले यांच्यासारखे मित्र सर्वांनाच मिळो, अशी आल्हा कडे प्रार्थना करतो आणि माझा हा छोटासा लेख पूर्ण करतो. माझ्यासह आपल्या सर्वांच्यावतीनं अविनाश इंगावले यांना वाढदिवसाच्या निमित्तानं खूप खूप शुभेच्छा.

शेख जावेद सर
मराठवाडा न्युज चैनल संपादक

# भारतीय सेनेतील संग्रामबाधित विकलांग जवानांच्या मदतीसाठी रोटरी क्लब डोंबिवली वेस्टचे सहाय्य

प्रतिनिधी । डोंबिवली

२०२४ च्या तीन मार्चच्या रविवारी , रोटरी क्लब ऑफ डोंबिवली वेस्ट आणि रोटरी प्रगती ट्रस्ट या संस्थेने आयोजित केलेल्या ' डोंबिवली प्राइड रन ' या मॅरॉथॉन शर्यतीत सोळा ते पंचाऐंशी पर्यंतच्या वयोगटाच्या, एक हजाराहून अधिक स्त्री- पुरुषांबरोबर आर पी एफ च्या पंचवीस तसेच एअर फोर्सच्या पंचवीस जवानांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. गेली सहा वर्षे सातत्याने राबवण्यात येणाऱ्या डी पी आर या मॅरॉथॉन स्पर्धेचा उद्देश जनसामान्यात शारीरिक स्वास्थ्याबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच, यातून उपलब्ध होणाऱ्या निधीचा विनियोग गरजू समाजाच्या आरोग्यासाठीच करण्यात येत आहे. दरवर्षी या निधीतून विविध समाजोपयोगी कार्य केले जाते, बालकांच्या हृदय शस्त्रक्रिया, कुपोषित गर्भवती महिलांना दत्तक घेणे, थालसीमिया च्या रुग्णांना मदत असे अनेक उपक्रम केले जातात. यंदाच्या स्पर्धेच्या गांगाजळीचा विनियोग मात्र आपल्या देशाच्या रक्षणासाठी आपले प्राण पणाला लावणाऱ्या शूर जवानांच्या हितासाठी केला गेला. युद्धात आपले कर्तव्य बजावताना जखमी झालेल्या अपंग सैनिकांसाठी पुणे येथे



चालविण्यात येणाऱ्या ' पॅराप्लेजिक रिहॅबिलीटेशन सेंटर (पी आर सी) या संस्थेला व्हीलचेअर्स पुरवण्याचा संकल्प गत वर्षीचे रोटरी क्लबचे अध्यक्ष दीपक काळे आणि उपक्रम प्रमुख श्रीधर गोडसे यांनी जाहीर केला होता. गतवर्षी झालेल्या उ्झठ च्या निधीतून यंदाचे क्लबचे अध्यक्ष मनोज ओक आणि त्यांच्या सहकारी यांनी या क्लबची उज्वल परंपरा आणि उदात्त हेतू कायम राखत हा सन्माननीय प्रकल्प पूर्णत्वास नेला. यासाठी डी पी आर मधून लाभलेला निधी तसेच प्रकल्प प्रमुख श्रीधर गोडसे, दीपक काळे, मंदार कुलकर्णी इत्यादींच्या अथक प्रयत्नांमुळे आणि व्यवसायाने सी ए असलेल्या शेखर पटवर्धन तसेच सी ए माधव खिस्ती यांच्या प्रयत्नांनी संपादन झालेल्या रोटरी डिस्ट्रिक्टच्या आर्थिक मदतीमुळे हा प्रकल्प यशस्वी होण्यास मोठाच हातभार लाभला. या प्रकल्पासाठी प्रामुख्याने खासदार श्रीकांत शिंदे फौंडेशन, आमदार रवींद्र चव्हाण यांचे डोंबिवलीकर एक परिवार, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२, उ्छड बँक आणि सदगुरू दादा रानडे चॅरिटेबल ट्रस्ट यांची खूप मोठी मदत झाली. शनिवार दिनांक ५ ऑक्टोबर २०२४ या दिवशी पुण्याच्या खडकी परिसरातल्या पी आर सी संस्थेच्या वास्तूत, बाधित जवानांना स्वयंचलित खुर्च्या प्रदान करण्याचा हा हृद्य सोहळा मोठ्या भावुक आणि लष्करी इतमामात संपन्न झाला.

या प्रसंगी सूत्रसंचालन करणाऱ्या झठउ च्या मुख्य आरोग्य अधिकारी कर्नल डॉ.मुखर्जी यांच्या मन हेलावून टाकणाऱ्या वक्तृत्वाने उपस्थितांची मने खूप भावूक झाली. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२ आणि भारतीय सेनेच्या विकलांग जवानांची पी आर सी या दोन संस्थांच्या दरम्यान या निमित्ताने निर्माण झालेला हा अनुबंध चिरकालपर्यंत असाच अभंग राहील असा विश्वास या सोहळ्यात व्यक्त करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ डोंबिवली वेस्ट च्या वतीने आणि रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर दिनेश मेहता यांच्या शुभहस्ते दोन स्वयंचलित आणि एक मॅन्युअल प्रकारची , अशा तीन व्हीलचेअर्स अपंगत्व प्राप्त झालेल्या जवानांना प्रदान करण्यात आल्या. आम्ही सर्वसामान्य जनतेचे घटक आमचे आणि आमच्या मातृभूमीचे प्राणपणाने रक्षण करणाऱ्या आणि हे कर्तव्य बजावताना स्वतःच्या शरीराची आणि अनेकदा जीवाची आहुती देणाऱ्या जवानांसाठी फार काही करू शकत नाही याची आम्हाला जाणीव आहे. तरीही जवानांच्या ऋणातून मुक्त होण्याचा आम्ही वेळोवेळी प्रयत्न करत राहू. असे सांगताना डिस्ट्रिक्ट गव्हर्नर दिनेश मेहता यांनी रोटरीच्या माध्यमातून भविष्यकाळात काही ना काही सहाय्य यथाशक्ती करण्याचे आश्वासन जवानांना दिले. प्रकल्प प्रमुख आणि रोटरीचे माजी अध्यक्ष श्रीधर गोडसे यांनी आपल्या भाषणात,

आपल्या आर्मी नेव्ही आणि एअरफोर्स मधे जायबंदी झालेल्या आपल्या सैनिकांना स्वावलंबी बनवण्यासाठी अनेक वर्कशॉप्स ही तेथे आहेत. एक चेअर ही ४ लाख किंमतीची असून त्या जर्मनीहून इंपोर्ट केल्या आहेत. आपण जी डोंबिवली प्राईड रन २०१७ पासून सुरू केली त्यातून हा निधी उभा राहिला. पहिल्या वर्षी आपण पन्नास गर्भवती महिलांना दत्तक घेऊन त्यांचे नऊ महिने संगोपन केले. इंग्लंडची राणी एलिझाबेथ (२पव) हिने या प्रकल्पाचे खास कौतुक केले होते. त्यांनतरच्या वर्षी आपण लहान मुलांच्या हार्ट सर्जरी केल्या त्याचेही संपूर्ण डिस्ट्रिक्टमधे चांगले नाव झाले.

कर्नल मुखर्जींनी एक यादी दिली होती त्यातून आपण व्हीलचेअर्स निवडल्या कारण ती एक गोष्ट अशी आहे जी त्यांना स्वावलंबी बनवते. असे सांगून संपूर्ण प्रकल्पाचा यथोचित आढावा घेतला. वरील सोहळ्याप्रसंगी रोटरीचे गतवर्षीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मिलिंद कुलकर्णी, यंदाचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर दिनेश मेहता , शिरीष सोनगडकर, रोटरी क्लबचे अध्यक्ष मनोज ओक, मानद सचिव अतुल गोखले, प्रकल्पप्रमुख व माजी अध्यक्ष श्रीधर गोडसे यांच्यासोबत क्लबचे माजी अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, संस्थापक सदस्य व माजी अध्यक्ष दत्ता कडुलकर, माजी अध्यक्ष दीपक काळे, मंदार कुलकर्णी इत्यादी मान्यवरही हजर होते.



# राष्ट्रीय मानव अधिकार सुरक्षा संघ व शिक्षण विभागाकडून दौंड मधील शाळांची अचानक तपासणी

प्रतिनिधी । बीड

राष्ट्रीय मानव अधिकार सुरक्षा संघ व शिक्षण विभागाकडून दौंड तालुक्यातील शाळांची विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबतीत अचानक पणे तपासणी करण्यात आली. यात भानोबा विद्यालय कुसेगांव, श्रीराम विद्यालय पडवी, आदर्श जिल्हा परिषद शाळा पडवी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मधुकर नगर या शाळांना भेटी देऊन तपासणी करण्यात आली.

पंचायत समिती दौंडचे शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी श्री. संजय महाजन व तसेच राष्ट्रीय मानव अधिकार सुरक्षा संघ (नवी दिल्ली) अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश श्री संदीपजी लोंढे व संघटक सचिव महाराष्ट्र प्रदेशचे शामू लोंढे, बीआरसी चे विशेष शिक्षक श्री माळी सर यांनी तपासणी केली. या विद्यालयांत तपासणी करत असताना सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती, तक्रार पेटी ई. याबाबतची माहिती घेण्यात आली. गटशिक्षणाधिकारी श्री. संजय महाजन व राष्ट्रीय मानव अधिकार चे सचिव शामू लोंढे यांनी विद्यार्थ्यांची सुरक्षाव्यवस्था व सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. तसेच तक्रारपेटी बाबतचे महत्त्व पटवून दिले यावेळी या विद्यालयातील सर्व विद्यार्थी हजर होते.

या होणाऱ्या अचानक भेटींमुळे सर्व शाळांमध्ये विद्यार्थी सुरक्षिततेबाबत च्या सुचनांचे व्यवस्थित रित्या पालन करून सर्व समितींचे ठराव रजिस्टर, तक्रारपेटी अद्ययावत केले असून शिक्षण विभागाकडून व राष्ट्रीय मानव अधिकार सुरक्षा संघाकडून कौतुक करण्यात आले व तसे शेरे देण्यात आले.भानोबा विद्यालय कुसेगांव येथील मुख्याध्यापक श्री. सुंबे सर, श्रीराम विद्यालय पडवी येथील मुख्याध्यापक श्रीमती पोळ मॅम, आदर्श जिल्हा परिषद शाळा पडवी येथील मुख्याध्यापक श्रीमती कुथवळ मॅम यांनी सहकार्य केले.

# बियाणे समिती : केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या उपससमितीच्या सदस्यपदी गोविंद देशमुख, विष्णुपंत सोळंके, अतुल मुंडे यांची निवड

## कृषिमंत्री धनंजय मुंडे, आ.पंकजाताई मुंडे यांनी केले अभिनंदन

प्रतिनिधी । मुंबई

केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालय अंतर्गत महाराष्ट्र राज्य कृषी आणि फलोत्पादन बियाणे उपसमितीच्या सदस्यपदी परळी वैजनाथ येथील गोविंदराव देशमुख, ॲड.विष्णुपंत सोळंके, अतुल मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने याबाबतचे परिपत्रक नुकतेच जाहीर केले आहे. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने या पदाधिकाऱ्यांची शिफारस केली होती.

केंद्र सरकारच्या केंद्रीय कृषी मंत्रालया अंतर्गत केंद्रीय बियाणे समिती कार्यरत असते. ही समिती राज्यनिहाय उपसमित्यांची नेमणूक करते. बियाणे कायदा, १९६६ च्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व बाबींवर राज्य सरकारला सल्ला देणे, राज्यातील बियाणे कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आणि राज्य सरकार/केंद्रीय बियाणे समितीला नियतकालिक अहवाल पाठवणे, राज्य बियाणे चाचणी प्रयोगशाळेची तपासणी करणे आणि बियाणे कायद्यांतर्गत राज्य बियाणे चाचणी प्रयोगशाळा म्हणून घोषित करण्यासाठी तिच्या योग्यतेचा अहवाल राज्य सरकारला देणे, बियाणे कायद्याची योग्य अंमलबजावणी



करण्यासाठी प्रोत्साहन देणे, राज्यासाठी पिकांच्या नवीन जाती घेण्याचा विचार करणे, राज्यात नव्याने प्रसिद्ध झालेल्या वाणांच्या कामगिरीवर लक्ष ठेवणे ही या समितीचे प्रमुख कार्य आहेत. या उपसमितीचे मुख्यालय मुंबई येथे असणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या सचिव या समितीच्या अध्यक्ष आहेत. तर कृषी आयुक्त, बियाणे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सर्व कृषी विद्यापीठांचे संशोधन संचालक आणि कृषी विभागाशी संबंधित विविध उपक्रमांचे पदाधिकारी हे सदस्य आहेत. नवनियुक्त तीनही पदाधिकाऱ्यांचे कृषिमंत्री धनंजय मुंडे व आ.पंकजाताई मुंडे यांसह माजी आ.संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर आबा चव्हाण, अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

बियाणे समितीवरील तीनही पदाधिकाऱ्यांबद्दल :गोविंदराव देशमुख हे परळी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अध्यक्ष असून अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे ते माजी सभापती आहेत, याशिवाय परभणी कृषी विद्यापीठाचे कार्यकारी परिषदेचे सदस्य होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य म्हणून सध्या ते कार्यरत आहेत. कृषी पदवीधर असलेले गोविंदराव देशमुख हे प्रगतशील आधुनिक शेतकरी असून शेती विषयक जाणकार आहेत.

ॲड.विष्णुपंत सोळंके हे परळी तालुक्यातील नागापूर येथील रहिवासी असून अंबाजोगाई येथील न्यायालयात ते वकिलीची प्रॅक्टिस करतात. मागील वीस वर्षापासून ते कॉटन फेडरेशनचे संचालक आहेत तसेच उपाध्यक्ष म्हणून कार्यरत राहिलेले होते. ते स्वतः कृषी उद्योजक असून कापूस जिनिंग सारखे कृषिपुरक उद्योग त्यांनी उभे केलेले आहेत. कापूस बियाण्यांचे उत्तम अभ्यासक म्हणून त्यांची ओळख आहे.

अतुल मुंडे हे परळी खरेदी-विक्री संघाचे संचालक असून, मुंडेंच्या जन्मगाव नाथरा सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन व मागील पंधरा वर्षांपासून संचालक आहेत. तरुण वयात आधुनिक पद्धतीने प्रगतिशील शेती करणारे शेतकरी म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केलेली आहे. धनंजय मुंडे यांनी ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल गोविंदराव देशमुख ॲड विष्णुपंत सोळंके तसेच अतुल मुंडे यांनी श्री.धनंजय मुंडे व कृषी विभागाचे आभार मानले आहेत.

---

### आष्टी पाटोदा शिरूरचे राजकारण तापले सहकार महर्षी बांगर दापत्यावर

# संकटाचा डोंगर कोणामुळं

## चोदा कोटी रुपयांचा अपहारप्रकरणात सत्यभामा बांगर याना अटक

प्रतिनिधी । बीड

महात्मा फुले अर्बन बँकेच्या माध्यमातून १४ कोटींच्या अपहारप्रकरणात ४१ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून यातील मुख्य आरोपी असलेल्या सत्यभामा बांगर यांना आज सकाळी राहत्या घरातून अटक करण्यात आली आहे. सपोनि बाळराजे दराडे यांनी ही अटक केल्याची माहिती असून आज श्रीमती बांगरला न्यायालयात हजर केले जाणार आहे.



बीड जिल्ह्यात मागच्या काही दिवसांपासून मल्टीस्टेट आणि सहकार क्षेत्रातील भोंगळ कारभार उजेडात येत आहे. महात्मा फुले बँकेसह चौदा सहकारी संस्था मध्ये चौदा कोटी रुपयांचा अपहार केल्याचे दोन दिवसापूर्वी उघड झाले होते. बांगर यांच्यासह ४१ लोकांवर गुन्हे दाखल झाले असून सत्यभामा बांगर यांना यात अटक झाली आहे. रामकृष्ण बांगर, सत्यभामा बांगर, बाळा बांगर यांनी महात्मा फुले अर्बन बँक, डेअरी, शैक्षणिक संस्था स्थापन केल्या होत्या. मागील तीस चाळीस वर्षेपासून बांगर यांचे साम्राज्य अबधित होते. वेगवेगळ्या राजकीय पक्षाच्या आशीर्वादाने बांगरयांनी करोडो रुपयांचा अपहार केला. मात्र त्यांच्यावर कारवाई झाली नव्हती. अखेर हा सर्व गैरभार उजेडात आल्यानंतर बांगर कुटुंबीय फरार झाले होते. सत्यभामा बांगर तुळजापूरला दर्शन घेऊन रात्री मध्यरात्री घरी आल्या होत्या. याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर आज सकाळी सपोनि बाळराजे दराडे यांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले आहे. सध्या सत्यभामा बांगर यांची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी घेऊन जाण्यात येत असून त्यानंतर न्यायालयात हजर केले जाणार आहे. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आता राजकारण तापलेले असतानाच आता सहकार महर्षी म्हणून ओळखले जाणारे रामकृष्ण बांगर सत्यभामा बांगर यांच्या वरती आता संकटाचा डोंगर कोणामुळे उभा राहिला याची चर्चा अख्ख्या मतदारसंघातून जिल्ह्यामध्ये ऐकायला मिळत आहे कारण राजकीय देशातून सुद्धा ही कारवाई झाली ची चर्चा सध्या राजकीय वर्तुळामध्ये जोर धरू लागली आहे

---

# माजलगाव मतदार संघातील माधव तात्या निर्मळ च्या हवेमुळे बाकीच्यांची दांडी गुल - गोरख सोनटक्के

प्रतिनिधी । तेलगांव

**विधानसभेच्या निवडणुका जश्या जशा जवळ येऊ लागल्या तसे तसे माधव तात्या निर्मळ यांची हवा जोर धरू लागली असून त्यांच्या हवेमुळे गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या उमेदवारांची दांडी गुल झाली आहे. माजलगाव मतदार संघात भावी उमेदवारांनी गाठीभेटी व विविध कार्यक्रमाचा धडाका लावला आहे. माजलगाव धारूर वडवणी तालुक्यात भावी उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते त्यांच्या वैयक्तिक कार्यक्रमात व न बोलवले तरीही सार्वजनिक कार्यक्रमाला हजेरी लावून मीच आमदार होणार अशी मतदारांना खात्री देत आहेत.**

माधव निर्मळ हे जनसामान्यातील व्यक्तिमत्व आहे. कुठेही अहंकार नाही.अविर्भाव नाही,त्यांच्यामध्ये कधीही मी पणा दिसत नाही. ते नावाप्रमाणेच निर्मळ आहेत त्यामुळे माधव निर्मळ यांची जन माणसात आपुलकीची भावना आहे. मतदारांची त्यांना पसंती आहे. मतदारांच्या तोंडात फक्त माधव तात्या यांचेच नाव आहे. त्यामुळे अनेक उमेदवारांनी माधव तात्याची धास्ती घेतलेली दिसत आहे. प्रचंड मतदारांच्या आशीर्वादाने माधव निर्मळ हे विधानसभेत जाणार आहेत. सर्व जाती धर्माला सोबत घेऊन चालणारा नेता म्हणून माधव तात्याची मतदारांना खात्री आहे. माजलगाव मतदार संघातील जनता आता बदल घडवण्याची संधी शोधत होता. प्रत्येक निवडणुकीत फक्त त्याच त्याच उमेदवाराला व त्यांच्या घराणेशाहीला जनता वैतागली आहे. त्यामुळे माधव तात्या निर्मळ च्या माध्यमातून माजलगाव मतदार संघात बदल घडणार आहे. सर्व जाती धर्मातील मतदारांमध्ये माधव तात्याचीच हवा दिसून येत असून या हवेमुळे गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या उमेदवाराची दांडी गुल झाल्याचे दिसत आहे. असे माजलगाव मतदार संघातील सामाजिक कार्यकर्ते गोरख सोनटक्के यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

---

# परळी हा येणाऱ्या काळात दिव्यांगांसाठी सर्वात जास्त सुविधा उपलब्ध करून देणारा मतदार संघ असेल - ना.धनंजय मुंडे

### दिव्यांगांच्या हृदयातील वेदना ओळखणारा नेता म्हणजे ना.धनंजय मुंडे- डॉ.संतोष मुंडे

### भव्य मोफत श्रवण यंत्र शिबिराचा घेतला १००० कर्णबधिरांनी लाभ

प्रतिनिधी । परळी

कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांतून दिनांक ७ ऑक्टोबर व ८ ऑक्टोबर रोजी श्रीनाथ हॉस्पिटल येथे कमी ऐकू येणाऱ्या / कर्णबधिर रुग्णांसाठी मोफत डिजिटल श्रवणयंत्र (कानाच्या मशीन) वाटप शिबीर अतिशय यशस्वी पणे संपन झाले .तब्बल १००० कर्णबधिर नागरिकांना या डिजिटल श्रवण यंत्रांचे मोफत वाटप करण्यात आले आणि ३७०० पेक्षा जास्त नवीन नागरिकांनी आपली नाव नोंदणी केली. अशी माहिती दिव्यांग मंत्रालयाचे उपाध्यक्ष व शिबिराचे संयोजक डॉ. संतोष मुंडे यांनी दिली.

या भव्य मोफत शिबिराचे उद्घाटन राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री ना.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या शुभहस्ते झाले.या प्रसंगी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, परळी विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख जिल्हा शल्य चिकित्सक डॉ .थोरात साहेब,श्रीनाथ मानव सेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ एकनाथ मुंडे,बीड



जिल्ह्याचे गटनेते अजयजी मुंडे,परळी तहसीलचे उपविभागीय अधिकारी लाटकर साहेब, तहसीलसर व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार रुपणर साहेब,राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके ,परळी मेडिकल असो.अध्यक्ष डॉ.शालिनीताई कराड ,सचिव डॉ. मनोज मुंडे ,पवन मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिराच्या उद्घाटप्रसंगी बोलताना परळी हा येणाऱ्या काळात दिव्यांगांसाठी शक्य तितक्या सुविधा उपलब्ध करून देणारा मतदार संघ असेल असे धनंजय मुंडे म्हणाले. डॉ.संतोष व त्यांची टीम दिव्यांगांना विविध सहाय्यक उपकरणे मोफत उपलब्ध करून देण्यासाठी सतत शिबिरे घेत असतात. त्याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे असेही ते पुढे बोलताना म्हणाले.तदनंतर या शिबिराचे संयोजक दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी प्रास्ताविकात बोलताना दिव्यांगांच्या हृदयाच्या वेदना जाणून घेणार नेता म्हणजे ना.धांजय मुंडे आहेत असे उद्गार काढले .आणि या मोफत वाटप केलेल्या १००० श्रवण यंत्राच्या माध्यमातून १००० गरजू दिव्यांगाच्या जीवनात एक अमुलाग्र बदल होईल असेही ते म्हणाले.अशा भव्य मोफत दोन दिवसीय शिबिरामध्ये परळी मतदार संघातील तब्बल १००० कर्णबद्धिर नागरिकांना मशिनद्वारे तपासणी करून श्रवण यंत्रांचे वाटप करण्यात आले .तसेच ३७०० पेक्षा जास्त नागरिकांची नवीन नाव नोंदणी करण्यात आली .१००० श्रवण यंत्रांचे वाटप करणारे हे मराठवाड्यातील सर्वात मोठे शिबीर आपल्या परळी मतदार संघामध्ये ना.धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून यशस्वी संपन्न झाले अशी माहिती या शिबिराचे संयोजक डिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी सांगितले.

**३७०० पेक्षा जास्त नागरिकांनी केली नवीन नावनोंदणी**

### मोबाईलचा अतिवापर टाळावा - धनंजय मुंडेंचा सल्ला

माझा पीए कार्यक्रमाकडे येत असताना सांगत होता की मागच्या काही दिवसांपासून त्याला एका कानाने कमी ऐकायला येत आहे. सतत फोनवर बोलल्याने मोबाईलचा अतिवापर होत असल्याने मला सुद्धा एका कानाने कमी ऐकायला येते. आजच्या युगामध्ये कर्णबधीरत्व येण्यासाठी मोबाईलचा अतिवापर हे सुद्धा एक कारण बनले आहे, त्यामुळे मोबाईलवर मोजके व कामाचेच बोलावे तसेच मोबाईलचा अतिवापर टाळावा असा सल्लाही यावेळी धनंजय मुंडेंनी उपस्थितांना दिला.

---

# आ. नमिता मुंदडांच्या प्रयत्नातून मिळालेल्या निधीतून देवस्थानांचा होतोय विकास

## अकरा कोटी रुपयांच्या निधीतून मंदिरांचा होतोय कायापालट

प्रतिनिधी । केज

**मतदार संघाचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असल्याचे ठासून सांगणाऱ्या केज मतदार संपाच्या आ नमिता मुंदडा यांनी आपले शब्द खरे ठरवत मतदार संघातील जनतेची गद्धास्थाने असलेल्या देवस्थानांना आकरा कोटींचा निधी आणला व आजघडीला त्यातून मंदिरांचा होत असलेला विकास पाहून नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.**

राज्यात दोन वर्षापूर्वी सत्ता बदल होऊन महायुतीची सत्ता आली अन केज मतदार विकासकामांची रेलचेल वाढली असे काहीसे चित्र मागील दोन वर्षात दिसून आले आहे केज मतदार संघातील रस्ते, वीज, पाणी यासाठी मोठा विकासनिधी आणण्यात मोठे यश मिळवून



सर्वांगीण विकासाचे बिरुद घेऊनच आपले कार्य चालू असल्याचे आ नमिता मुंदडा यांनी दाखवून दिले, यावरतीच त्यांनी समाधान न मानता आपला मोर्चा मतदार संघातील हजारो लोकांची श्रद्धास्थाने असलेल्या विविध मठ व मंदिरांच्या विकासाकडे वळवला वर्षभरात त्यांनी सोहळा देवस्थानांच्या विकासासाठी पर्यटन विकास व तीर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत आकरा कोटींच्या आसपासचा निधी खेचून आणण्यात यश मिळवले आहे. यात प्रामुख्याने पर्यटन विकास निधी अंतर्गत नेकनूर येथील बंकटस्वामी संस्थानसाठी ७० लाख रुपयांचा कीर्तन मंडप विडा येथील शिवरामपुरी मठ संस्थान साठी ५० लक्ष रुपयांचा सभामंडप, वरपगाव येथील शिवरामपुरी मठसंस्थानसाठी १ कोटी १० लक्ष रुपयांचा सभामंडप, आडस येथील आडकेश्वर महादेव मंदिरासाठी २५ लक्ष, आडस येथील हनुमान मंदिरासाठी २५ लक्ष आवसगाव येथील श्रीराम मंदिरासाठी ५० लक्ष रुपये, युसुफवडगाव येथील श्रीराम मंदिरासाठी ५० लक्ष रुपये, बापेबाभूळगाय येथील वाघेश्वरी देवी मंदिरासाठी ५० लक्ष रुपये, रामेश्वरवाडी (हंगेवाडी येथील महादेव मंदिरासाठी २५ लक्ष रुपये, सासुरा येथील एकनाथ महाराज समाधी मंदिरासाठी २५ लक्ष रुपये, नंदुरघाट येथील तळ्याची आई देवस्थानसाठी ४० लक्ष रुपये, धनेगाव येथील मेसाईदेवी मंदिरासाठी ५० लक्ष केज येथील भवानी आई मंदिरासाठी २५ लक्ष केज येथीलच हजरत ख्वाजा महजबोद्दीन दर्गाहसाठी २५ लक्ष रुपये, दहिफळ बडमाऊली देवस्थानसाठी ५० लक्ष विकास निधी अं कुंबेफळ येथील सिद्धिविनायक मंदिरासाठी २ कोटी रुपये, दहिफळ वडमाऊली येथील देवस्थानसाठी २ कोटी रुपये असा निधी मागील दोन ते तीन महिन्यांपूर्वी मंजूर झाला होता यातून काही ठिकाणी सभामंडप, किचनशेड, पालखी हॉल, पेव्हर ब्लॉक, व सुशोभीकरण अशी विविध कामे होणार आहेत यातील काही ठिकाणची कामे प्रगतीपथावर आहेत तर काही लवकरच सुरु होणार आहेत. एकूणच आपली आस्था व गद्धा असलेल्या देवस्थानांचा विकास व कायापालट होणार असल्याने व मंदिर परिसरात निवाऱ्याबी सोय होणार असल्यामुळे भक्तांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.


---

# कडा येथील जळालेला ट्रान्सफॉर्मर तात्काळ दुरुस्तीची मागणी-रवि काका ढोबळे

प्रतिनिधी । आष्टी

कडा ता. आष्टी जि.बीड येथे गेल्या एक दिड महिण्यापासुन सबस्टेशन ३३ के.व्ही. मधील ट्रान्सफार्मर जळाल्यामुळे पुढील गावांचा विज पुरवठा खंडीत झाला आहे. देविनिमगांव, केरूळ, डोंगरगण, शेरी खुर्द, शेरी बु ।।कडा ग्रामिण, चाोभानिमागांव, खाकाळवाडी, मोरेवाडी, लिंबोडी शेलारवाडी नांदा या १० ते १२ गांवाचा समावेश असून त्यामुळे मुलांचे अभ्यासाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच पिण्याचा पाण्याचा व जनावरांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. विजपुरवठा खंडीत असल्यामुळे जनजिवन विस्कळीत झालेले आहे. तसेच शेतकऱ्यांची सध्या कांदा, मका पेरणी केलेली आहे व कापुस व तुर या पिकांना पाणी देणे अत्यंत गरजेचे आहे. वरील ट्रान्सफार्मर जळाल्यामुळे कधी टाकळी अमिया सबस्टेशनला लाईट जोडली जाते तर कधी धामणगांव सबस्टशेनला लाईट जोडली जाते त्यामुळे सदरील परिसरातील शेतकाऱ्यांना सुध्दा लाईट कमी दाबाने मिळते त्यामुळे शेतकऱ्यांच्या मोटरा चालत नाहीत. व शेतीला पाणी पुरवठा मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात असे आर्थीक नुकसान होत आहे.

याबाबत कॉग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष रवि काका ढोबळे यांनी निवेदन दिले.तात्काळ सबस्टेशन कडा येथील ट्रान्सफार्मर बसविण्यात यावे.ट्रान्सफारर्मर आठ दिवसामध्ये बसविला नाही तर आठ दिवसानंतर आष्टी तालुका कॉंग्रेस



कमिटीच्या वतीने कडा येथील आंबेडकर चौकात रस्ता रोको अंदोलन केले जाईल अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी उपस्थित काकासाहेब कर्डिले, राम वाडेकर, आजिनाथ महाडिक, नजमुद्दीन शेख,वसंतराव चव्हाण, संपत सायकड, बाळू कटके आदी उपस्थित होते

---

**टी.सी.हरवला आहे**

**मोईस अनीस सय्यद यांचा ईयात्ता १२ वि पासचा दाखला माजलगांव बस स्टँड परिसरत हरावला आहे सापड़ल्यास संपर्क साधावा.**

**संपर्क ९४२३०३०९६७**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT